# रारंगढांगचे समाजभाषावैज्ञानिक विश्लेषण

**डॉ. आप्पा दत्तू माने**
महात्मा फुले नूतन महाविद्यालय,मिरजगाव .
ता. कर्जत, जि. अहमदनगर.४१४४०१.

**प्रास्ताविक :-**

रारंगढांग प्रभाकर पेंढारकर यांची १९८१ मध्ये प्रकाशित झालेली एक वेगळ्या विषयावरील कादंबरी आहे. २०१९ पर्यंत या कादंबरीच्या १८ आवृत्त्या प्रकाशित झालेल्या आहेत यावरूनच या कादंबरीची यशस्विता दिसून आल्याशिवाय राहत नाही. याबरोबरच या कादंबरीने चाळीस वर्षानंतर ही आपली कालातीतता टिकवून ठेवलेली दिसून येते. १९८० नंतरच्या कादंबरीचा एक टप्पा मानला जातो. त्यानंतर कादंबरी या प्रकाराने अनेक विषय हाताळले परंतु पेंढारकरांनी या कालखंडाच्या सुरुवातीसच जो विषय हाताळला तो अत्यंत जिवंत आणि नाविन्यपूर्ण अशा स्वरूपाचा आहे.या कादंबरीचा आजही अनेक अंगाने विचार मांडता येऊ शकतो.

रारंगढांग ही कादंबरी मानवी जीवनाविषयी नैतिक मूल्यविषयक अतिशय मार्मिक असे भाष्य करताना दिसते. या कादंबरीमध्ये माणसांचा निसर्गाची चाललेला संघर्ष तसेच असंख्य गुणधर्म असणारी माणसे चित्रित झालेली आहेत. प्रचंड इच्छाशक्ती, अफाट महत्वकांक्षा ,आव्हाने, प्रचंड मेहनत घेण्याची तयारी अशा वेगवेगळ्या व्यक्तित्वाची माणसे या कादंबरीत दिसून येतात. त्यामुळे ही कादंबरी स्वतःचे वेगळेपण निर्माण करताना दिसते. या कादंबरीचा समाजभाषावैज्ञानिक विचार करताना तिचे कथानक दुर्लक्ष करून चालणार नाही; त्यामुळे प्रथमत: आपण प्रस्तुत ठिकाणी रारंगढांगचे कथानक विचारात घेणार आहोत.

**रारंगढांगचे कथानक :-**

रारंगढांग ही कादंबरी हिमालयातील डोंगराच्या कुशीतील वेगळे जीवनवास्तव चित्रित करणारी कादंबरी आहे. या कादंबरीमध्ये विश्वनाथ मेहेंदळे हा नायक असून तो सिव्हिल इंजिनिअर असतो. त्याच्याकडे हिमालयातील कडेकपारीतून सारंग परिसरातून रस्ता बांधण्याचे काम असते. या माध्यमातून त्याचा त्या परिसरातील वेगवेगळ्या व्यक्तींशी संपर्क येतो व यातूनच या कादंबरीचे कथानक पुढे सरकत जाते. नायकाच्या निरीक्षणातून तेथील समाजवास्तव ,जगण्याच्या विविध पद्धती, बॉर्डर रोड वरील वातावरण, मिलिटरीतील लोकांचे जगणे, तेथील शिस्त इत्यादींचे चित्रण झाले आहे. या कादंबरीच्या माध्यमातून आर्मीतील कामाची पद्धत, वेगळी भाषा, तेथील लोकांच्या वागण्याच्या तऱ्हा याचेही चित्रण आले आहे.

प्रमुख बाब म्हणजे या कादंबरीमध्ये येणारे संवाद व वापरली गेलेली भाषा याचे वेगळेपण जाणवल्याशिवाय राहत नाही. त्यामुळेच या कादंबरीचा समाजभाषावैज्ञानिक अभ्यास मला महत्वाचा वाटतो. या कादंबरीतील भाषा व संवाद यांचा समाजभाषिक अभ्यास केल्यास काही वेगळी निरीक्षणे आपल्या हाती लागण्याची शक्यता आहे. त्यामुळेच प्रस्तुत ठिकाणी रारंगढांग चे समाजभाषावैज्ञानिक विश्लेषण करण्याचा प्रयत्न मी करत आहे .तत्पूर्वी समाजभाषाविज्ञान संकल्पना थोडक्यात विचारात घेणे गरजेचे आहे.

**समाजभाषाविज्ञान संकल्पना :-** १९६० नंतर समाजभाषाविज्ञान या अभ्यास शाखेचा उगम झाला,असे

नमूद केले असले तरी यापूर्वीही भाषेच्या सामाजिक संदर्भाची जाणीव अनेक वर्षे गतिमान होती; त्यामुळे समाजभाषाविज्ञान शाखेचा उद्गम आणि विकास याविषयीची भाषा अभ्यासकांची मतमतांतरे दिसून येतात ;परंतु समाजभाषाविज्ञान शाखा भाषेचा सामाजिक संदर्भ विचारात घेण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. समाजाचा विचार समाज विज्ञानात केला जातो तर भाषेचा अभ्यास भाषाविज्ञानात केला जातो. या दोघांच्या परस्पर अध्ययन प्रक्रियेतून समाजभाषाविज्ञान उदयाला आलेले आहे .भाषेचा सामाजिक दृष्टिकोन समाजभाषाविज्ञानात महत्त्वाचा आहे. भाषाव्यवहार ही संकल्पना समाजभाषाविज्ञानात केंद्रीभूत मांडली जाते.

समाजभाषाविज्ञानाची संकल्पना समजून घेण्यासाठी रमेश वरखेडे यांनी मांडलेली व्याख्या अत्यंत महत्त्वाची आहे, ते लिहितात, "भाषाव्यवहार आणि सामाजिक संरचना यात परस्परावलंबीत्वाचे नाते आहे. लौकिक जीवनात भाषेचा उपयोग व्याकरणिक नियमांनी होत नसून सामाजिक संकेतांनी होत असतो; त्यामुळे भाषेचा अभ्यास हा एका अर्थाने समाजाचा अभ्यास होईल." यावरून समाजभाषाविज्ञानात भाषा व्यवहाराला महत्त्व दिलेले दिसून येते. आर.ए. हडसन यांच्या मते ," समाजभाषाविज्ञान म्हणजे भाषा आणि समाज यांच्यातील अंतरसंबंधाचा अभ्यास होईल."

एकंदरीत विचार करता समाजभाषाविज्ञान विशिष्ट समाज,त्यांची बोलली जाणारी भाषा विचारात घेऊन तेथील समाजाचा लेखाजोखा मांडण्याचा प्रयत्न केला जातो व अशा अभ्यासातून भाषा ,समाज आणि संस्कृती यांचा वेध घेण्याचा प्रयत्न केला जातो. समाजभाषाविज्ञानाचा अभ्यास करताना यामध्ये सामाजिकशास्त्रे, भौतिकशास्त्र, साहित्यशास्त्र, कला इत्यादींचा आधार घेतला जातो. भाषेचा सामाजिक अभ्यासही समाजभाषावैज्ञानिक संशोधनातील प्राथमिक पायरी म्हणून लक्षात घ्यावी लागते .याबरोबरच या शाखेमध्ये काही संकल्पना महत्त्वाच्या आहेत .यामध्ये भाषिक भांडार व लघु क्षेत्र संकल्पना, भाषिक समाज ,भाषाव्यवहार, भाषासंपर्क व समाजभाषाकोश इत्यादींचा समावेश आहे. या संकल्पनांच्या आधारे प्रस्तुत ठिकाणी रारंगढांग या कादंबरीचा विचार मांडता येऊ शकतो. प्रस्तुत ठिकाणी काही संकल्पनांच्या आधारित रारंगढांग या कादंबरीचे समाजभाषावैज्ञानिक विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

**रारंगढांगचे समाजभाषावैज्ञानिक विश्लेषण :-**

भाषेचा सामाजिक अभ्यास ही समाजभाषावैज्ञानिक संशोधनातील महत्त्वाची भूमिका गृहीत धरून रारंगढांग या कादंबरीची भाषा व तिच्यातून व्यक्त झालेला वेगळा समाज कसा अवतरला आहे याचे विश्लेषण प्रस्तुत ठिकाणी मांडले जाणार आहे. समाजभाषाविज्ञानातील काही संकल्पना उदा. भाषाव्यवहार, भाषासंपर्क, समाजभाषाकोश इत्यादींच्या अनुषंगाने कलाकृतींचे विश्लेषण केले जाते. प्रस्तुत ठिकाणी समाजभाषाविज्ञानातील 'भाषाव्यवहार' या संकल्पनेवर आधारित 'रारंगढांग' या कादंबरीचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातूनच या कादंबरीचे वेगळेपण नोंदविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

समाजभाषाविज्ञानात भाषाव्यवहार ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची आहे. भाषा वापराची सामाजिक प्रमाणे ,भाषिक प्रतिष्ठेच्या कल्पना, भाषकांचे सामाजिक व्यवस्थेतील स्थान ,त्याचा सांस्कृतिक परिसर, भाषकांचे वय ,जात इत्यादी सामाजिक घटकांमुळे होणारा भाषाव्यवहार समाजभाषाविज्ञानात महत्त्वाचा मानला जातो .वरील सर्व घटक रारंगढांग कादंबरीतील भाषाव्यवहारात दिसून येतात . मुळातच रारंगढांग कादंबरी आर्मीतील अधिकारी-कर्मचारी यांच्या जीवन वास्तवावर आधारित आहे .त्यामुळे आर्मी भाषिक समाज म्हणून सबंध

कादंबरीकडे आपणाला पाहावे लागते. आर्मीतील जगण्याला विशिष्ट असा एकसंधपणा असतो. त्यांचे भाषिक संकेत विशिष्ट असतात. हे संकेत भाषाव्यवहारात प्रतीत होतात. यावरून आर्मीतील अधिकारी-कर्मचारी यांच्या भाषाव्यवहाला एक वेगळे वळण दिसून येते.

अभिवादनव्यवहार हा भाषाव्यवहाराचा एक महत्त्वाचा भाग मानला जातो. रारंगढांग मध्ये अभिवादनव्यवहार वेगळ्या स्वरूपाचा जाणवतो. उदा. "मेजर बंबा जीपमधून उतरले. सलाम करत गुरखा पुढं आला. तसे हसून ते त्याला म्हणाले. "क्यो बहादूर, डर गया?" (पृ.क्र. 13). वरील मेजर आणि मुकादम यांच्यातील संवादात मुकादम सलाम करतो. म्हणजेच आर्मीमध्ये कनिष्ठ यांनी वरिष्ठांना सॅल्युट करणे ,सलाम करणे या प्रकारातून अभिवादन केले जाते. दोन समान दर्जाचे अधिकारी असतील तर एकमेकांना हस्तांदोलन करून अभिवादन केले जाते. ही आर्मी भाषिक समाजाची वेगळेपण सिद्ध करणारी बाब आहे. ज्याप्रकारे सर्वसामान्य समाजातील जीवनात रामराम, नमस्कार, जय महाराष्ट्र इत्यादी अभिवादन प्रकार वापरले जातात ,असे प्रकार आर्मीत वापरले जात नाहीत .सैन्यदलात नियमांना खूप महत्त्व दिले जाते . रारंगढांग या सबंध कादंबरीत कुठेही इतर अभिवादन प्रकार दिसून येत नाहीत.

समाजभाषाविज्ञानात दोन व्यक्तींचा भाषाव्यवहार महत्त्वाचा असतो .त्यामधूनच त्या त्या व्यक्तींची सामाजिकता, त्यांचे मूल्य धारण दिसून येत असते .रारंगढांग मध्ये अशा प्रकारचे संवाद मोठ्या प्रमाणात दिसून येतात. विशेष: दोन समान दर्जाचे अधिकारी वरिष्ठ व कनिष्ठ यांच्यातील संवाद या कादंबरीत मोठ्या प्रमाणात दिसून येतात. उदा. " क्या नाम है तुम्हारा?"

" सर्जेराव गायकवाड, सर।"

"क्या काम करता है यहा?"

"बुलडोझर के साथ ही रहता हु ."...... "बोलो क्या हो रहा था यहा?"..........." क्या तुम्हे मालूम नही, यहा फोटोग्राफि पर बंदी है?" " हा जी मालूम है।" "तो फोटो लेने वाला और जिसका लिया जा रहा है ,दोनो को मै बकायदा चार्जशीट कर सकता हु।" सर्जेराव हादरलाच." (पृ. क्र. ६०). हा संवाद रारंगढांग मधील मेजर बंबा व त्याचे कनिष्ठ अधिकारी मेहेंदळे व सर्जेराव यांच्यातील आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांचा कनिष्ठ यांच्याशी संवाद कसा होतो, याचे हे उत्तम उदाहरण आहे. सर्जेराव व विश्वनाथ कामकाज चालू असताना निवांत वेळेत फोटो घेत असतात. तो फोटो सर्जेरावला लग्नासाठी दाखवायचा असतो; परंतु मेजर बंबा हे आर्मीतील नियमांचे काटेकोर पालन करणारे अधिकारी असतात. त्यामुळे त्याच पद्धतीने ते त्या दोघांनाही कार्यवाही करण्याची भाषा वापरतात .या संवादातून त्या त्या व्यक्तीचे त्यांच्या पदावरून कसे निश्चित होते व त्याच्या सीमा कशा निश्चित होतात, याचे एक उत्तम उदाहरण म्हणून पाहता येते.

दोन समान दर्जाचे अधिकारी यांच्यातील संवाद मात्र अनौपचारिक असतो. त्यात साधेपणा असतो. माणसातील अंतर्मनाचा वेध यातून घेता येतो. त्याच्या स्वभावातील मूळ छोटा आपणाला अशा संवादातून अभ्यासता येतात. उदाहरणादाखल आपणाला मेजर नायर आणि मिनू खंबाटा यांच्यातील भाषाव्यवहार विचारात घेता येईल,"मिनून अंगावर मुफ्ती चढवली आणि तो नायरला म्हणाला," चलो आज घूमने चलेंगे." " कुठे जायचं." "कुठही। खुदादाद सर्कल, नरिमन पॉईंट, मलबार हिल, जिथे मिनीस्कर्ट तिथे आपण।" इथं मिनीस्कर्ट कुठला मिळणार?" " मिलेगा यार, किस्मतमध्ये असेल तर तो इथे हिमालयात येऊन समोर उभा राहील." चलो दोस्त ." (पृ. क्र. ९७ ). या भाषाव्यवहारात अधिकार गाजवला जात नाही. याठिकाणी दोघेही स्वतःचे पद बाजूला ठेवून संवाद साधताना दिसतात. कोणीही कोणावर अधिकारवाणीने

बोलताना दिसत नाही. अशा वेळी मानवी स्वभावातील सूक्ष्म छटा दिसून येतात. यातून प्रस्तुत कादंबरीत पात्रांना जिवंतपणा आलेला दिसून येतो.

समाजभाषाविज्ञानात स्त्रियांची भाषा व पुरुषांची भाषा यांचा वेगळ्या भूमिकेतून अभ्यास केला जातो. स्त्री पुरुषांचे भाषाव्यवहाराचे स्वरूप वेगळे असते. स्त्री-पुरुषांमधील भाषा व्यवहारात काही सामाजिक संकेत प्रतिबिंबित झालेले असतात .यामध्ये पुरुषांना आदराचे, श्रेष्ठत्वाचे स्थान दिले जाते तर तुलनेने स्त्रीला भाषा व्यवहारात फारसे महत्त्वाचे स्थान दिले जात नाही .उदा. ..... "मला तुमच्याशी बोलायचं होतं...... 'बोल मी ऐकतो आहे.' 'हिमालयातून तुमची बदली कधी होणार?' 'बहुतेक पुढच्या वर्षी. 'फॅमिली स्टेशन?' 'हो. बहुतेक मिळेल।' 'कुठं?' 'कुठेही। हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत पसरलेल्या या भारतात कुठेही. ' 'दिल्लीलाच करून घ्या.' 'ओके. चीफ ऑफ स्टाफला कळवून टाकतो, आमच्या मिसेस म्हणाल्या, बदली दिल्लीलाच झाली पाहिजे।" " तुमचे विनोद पुरे करा. ".....( पृ. क्र.८०). हा कादंबरीतील अधिकारी व त्यांची पत्नी यांच्यातील संवाद आहे .यावरून स्त्रियांना भाषा व्यवहारात किती महत्त्व दिले जाते. याचे प्रत्यंतर आल्याशिवाय राहत नाही. पुरुषप्रधान संस्कृतीचा प्रभाव वरील भाषाव्यवहारात झालेला दिसून येतो .कुटुंबात पत्नीने कोणतीही सूचना करायची नाही, असा संकेत समाजात रूढ आहे. याची प्रचिती वरील संवादात आलेली आहे .कारण संवादात शेवटी पत्नी पतीला म्हणते की 'विनोद पुरा आता' म्हणजेच पत्नीला भाषा व्यवहारात गौण स्थान दिलेले दिसून येते.

एकूणच तरुणांच्या भाषेत खूप व्यापकता दिसून येते. प्रस्तुत कादंबरीतील नायक विश्वनाथ मेहेंदळे हा एक तरुण आहे .त्याबरोबरच या कादंबरीत मिनू खंबाटा ,सर्जेराव गायकवाड ,शांताराणी ,उमा ,मेजर नायर इ. तरुण आहेत. यांचे संवाद अत्यंत आगळ्यावेगळ्या स्वरुपाचे दिसून येतात. सभोवतालच्या बदलांना अत्यंत गतीने सामोरे जाण्याची भाषा तरुणांच्या भाषाव्यवहारात दिसून येते. तरुणांच्या भाषेत तारुण्यसुलभता दिसून येते .आपले स्वतंत्र अस्तित्व सिद्ध करण्याची मानसिकता, समवयस्कांविषयी आपलेपणाची भावना, भिन्नलिंगी आकर्षण अशा विविध पातळ्यांवरील तरुणांची भाषा वेगळी ठरते. उदा., "कंदील लावून काय करतो आहेस एवढ्या रात्री?" रामप्रसादनं विचारलं. "पत्र लिहितोय."" कुणाला?' "दुसऱ्या कुणाला? आईला।" "चांगली वेळ काढली, झोप आता" "येईना." " आठवण येते वाटतं. लग्न ठरलं तुझं." निदान त्या मुलीला तरी पत्र लिहायचास " "छ्या." "छ्या काय। लग्न झाल्यावर बोलणार नाहीस तिच्याशी?" " बोलेल रे, पण आता काय लिहू?" " लिही. तुझी आठवण फार येते आहे. तुला कधी बघेन असं मला झालं आहे." ( पृ. क्र.७८ ). तसेच, " कुठे जायचं?' कुठेही' 'जिथं मिनीस्कर्ट तिथ आपण." (पृ. क्र. ९७). किंवा मिनू आणि विश्वनाथ यांच्यातील हा संवाद, " दोस्त खरं सांग. कधी वडील माणसांचा डोळा चुकवून तू शिगरेट ओडलीस? 'नाही. ' एकदा तरी ड्रिंक घेतलेस?' बिअर तरी?" नाही. 'कुणाच्या मिठीत काळ्याभोर केसांच्या धूंद वासात स्वतःला हरवून गेलायस?' नाही.' " (पृ. क्र. १०१ ). वरील पहिला संवाद हा आर्मीत काम करणारे तरुण रामप्रसाद व नायक सर्जेराव गायकवाड यांच्यातील आहे. सर्जेराव हा आईला पत्र लिहितो आहे; परंतु रामप्रसाद त्याला बायकोला पत्र लिहितो आहेस काय? असा प्रश्न विचारतो. त्यावर तो त्याची खिल्ली उडवतो. होणाऱ्या पत्नीची आठवण येते म्हणून तुला झोप येत नाही, असा तो तर्क काढतो. दुसऱ्या संवादात मिनू खंबाटा हा मुक्त जीवन जगणारा असल्याचे दिसते. तो फिरायला जायचे म्हणजे चांगल्या मुली पाहण्यासाठी जायचे असा विचार त्याचा दिसून येतो . तसेच मिनू आणि विश्वनाथ यांच्यातील संवादही तो विश्वनाथला कधी ड्रिंक घेतलीस का? किंवा

कुणाच्या मिठीत विसावला आहेस का? असे प्रश्न विचारतो. वरील सबंध तरुणांच्या संवादात भिन्नलिंगी आकर्षण मोठ्या प्रमाणात दिसून येते ,त्याची प्रचिती येताना दिसते.

याबरोबरच तरुणांच्या भाषेत एक प्रकारचा आत्मविश्वास ,संघर्ष करण्याची ताकद ,याही बाबींचा प्रत्यय येतो. कादंबरीतील नायक तरुण असतो. त्याला काहीतरी करायचे असते. त्याच्या अंगी संघर्ष करण्याची ताकद असते. या सर्वांची प्रचिती त्याच्या संबंध कादंबरीतील भाषाव्यवहारातून दिसून आल्याशिवाय राहत नाही; त्यामुळेच त्याला खडतर परिस्थिती ही सुखकर वाटते. उदा.,"इथला निर्जन पहाडी मुलुख, लहरी निसर्ग, जवानांची आणि गुरखा यांची संगत, ही पत्र्यांची आणि मातीची खोली, हा कंदिलाचा सौम्य प्रकाश, सर्वच कितीतरी अधिक सुखकर।" (पृ. क्र. ३६ ). तसेच तो म्हणतो ,"रणांगणावर सुतक पाळत नसतात. हे ही एक प्रकारे रणांगणात."( पृ. क्र.३१). यावरून हे स्पष्ट होते ,की विश्वनाथ हा तरुण आहे. त्याची अशी एक जिद्द आहे. ती पूर्ण करण्यासाठी कोणतीही संकटे त्याला संकटे वाटत नाहीत. स्वतःच्या कार्यात तो भारावून गेल्याचे दिसते. त्यामुळे त्याच्या तोंडी संघर्षाची, करारी भाषा येते. यातून सबंध कादंबरीत त्याचे व्यक्तिमत्व स्वतःचे वेगळेपण सिद्ध करताना दिसते व कादंबरीला यशस्वीतेकडे घेऊन जातो.

याबरोबरच प्रस्तुत कादंबरीचा भाषासंपर्क या समाजभाषावैज्ञानिक सुत्रानुसारही वेगळा अभ्यास करता येऊ शकतो ;कारण कादंबरीत व्यक्तीबोली संपर्क, परभाषा संपर्क, द्विभाषिकता ,भाषिक परिवर्तन, भाषाबदल, भाषामिश्रण इत्यादी घटकांचा प्रत्यय जागोजागी जाणवतो, तसेच प्रस्तुत कादंबरीचा समाजभाषाकोशही एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय होऊ शकतो. एवढे भाषिक वेगळेपण सिद्ध करणारी ही कादंबरी आहे असे मला वाटते.

**समारोप :-**

एकूणच विचार करता 'रारंगढांग' ही कादंबरी मराठी कादंबरीत अभावानेच आलेले जे हिमालय, तेथील माणसे, निसर्ग, संस्कृती, आचार-विचार यांचे मनोभावे दर्शन घडविते. दुसऱ्या बाजूला तेथील माणसांच्या जगण्याची असणारा संघर्ष, त्यांच्या कामाची पद्धत ,आव्हाने, शिस्तीने माणसांची होणारी पिळवणूक, सैन्यातील अधिकाऱ्यांची काम करून घेण्याची पद्धत या सर्वांबरोबरच एक व्यक्ती आपल्या मनात शेवटपर्यंत घर करून राहतो तो म्हणजे विश्वनाथ मेहेंदळे. त्याची काम करण्याची, विचार करण्याची पद्धत ,एकमेकांना समजून घेण्याची वृत्ती आणि नैतिक मूल्य, विवेक यांना असणारे जीवनातील स्थान हे सर्व पाहिल्यावर व्यक्तीचे मूल्यमापन करताना याच गोष्टी आपल्याला केंद्रवर्ती ठेवाव्या लागतात, याची प्रचितीआल्याशिवाय राहत नाही.

प्रस्तुत कादंबरीत जी मानवी जीवनातील नैतिक मूल्य उलगडण्याचे कार्य झाले आहे, हे कार्य समाजभाषावैज्ञानिक अभ्यासातून अधिक प्रभावीपणे प्रतीत झाल्याचे दिसून येत. भाषाव्यवहार ही संकल्पना प्रमाण म्हणून प्रस्तुत ठिकाणी रारंगढांग कादंबरीतील भाषाव्यवहार आपण विचारात घेतला यातूनच यातील पात्रे, त्यांची वेगळी प्रवृत्ती, समाजजीवन ,संस्कृती यांची वेगळी बाजू नजरेसमोर आली, यातूनच कादंबरीची वेगळी उंची लक्षात आल्याशिवाय राहत नाही.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. पेंढारकर प्रभाकर, रारंगढांग ,मौज प्रकाशन, मुंबई .१८ वी आवृत्ती, २०१९.

२. धोंगडे रमेश, सामाजिक भाषाविज्ञान, दिलीपराज प्रकाशन ,पुणे . १९८३.

३ . मोरे नंदकुमार, समाजभाषाविज्ञान आणि मराठी कादंबरी , पद्मगंधा प्रकाशन ,पुणे.२०१२.

४. वरखेडे रमेश, समाजभाषाविज्ञान प्रमुख संकल्पना, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर.२००१.

५ .हरेश शेळके, चिने गीतांजली, चौरे अतुल, आधुनिक साहित्य प्रकार कादंबरी: रारंगढांग, अक्षरवेद प्रकाशन, पुणे. २०२०.

६. Hadson R.A., Sociolinguistics, Cambridge University Press, First edition- 1980